# <u>उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी पूर्व तयारी बाबत सूचना</u>

1. "नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागांतर्गत गट-क पदभरती - 2018" च्या जाहिरात क्रमांक 1/2018 मध्ये नमूद सूचनांचे अवलोकन करून त्यानुसार पडताळणीसाठी आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.
2. या टप्प्यावर उमेदवाराची करण्यात आलेली निवड ही त्यांने अर्ज सादर करताना त्याचे पात्रते संबधी ऑनलाईन अर्जाद्वारे केलेल्या दाव्याच्या आधारे करण्यात आलेली आहे. पात्रता/सवलती संदर्भात ऑनलाईन अर्जामध्ये केलेल्या प्रत्येक दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता/सवलत देय होणार अथवा उमेदवाराची निवड अंतिम समजण्यात येणार नाही.
3. उमेदवाराने केलेल्या प्रत्येक दाव्याची पडताळणी ही संबधीत कागदपत्राच्या मूळ प्रतीवरून करावयाची आहे. त्यामुळे पडताळणी साठी फक्त मूळ कागदपत्रे विचारात घेण्यात येतील. इतर कोणत्याही स्वरूपाच्या प्रतीवरून अशी पडताळणी करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी .
4. शक्यतो कोणतेही मूळ कागदपत्रे ठेवून घेण्यात येणार नाहीत. ती पडताळणी नंतर उमेदवारास परत करण्यात येतील
5. तपासणीसाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने स्वत: उपस्थित राहून त्याने अर्जात दावा केलेल्या बाबींच्या तपासणीसाठी संबधीत मूळ कागदपत्रे, व त्यांच्या प्रत्येकी दोन साक्षांकित प्रती व दोन पासपोर्ट साईज फोटो यासह उपस्थित राहावयाचे आहे.
6. नवी मुंबई महानगरपालिकेकडे कागदपत्रे पडताळणीकामी उपस्थित राहतांना विहित केलेले प्रपत्र भरून सादर करावयाचे आहे. सदर प्रपत्राचा नमुना नवी मुंबई महानगरपालिकेच्या पोर्टलवरून डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे.
7. उमेदवाराने विहित नमुन्यातील प्रपत्र स्व-हस्ताक्षरात भरून त्याचे प्रत्येक पानावर स्वाक्षरी करून पडताळणीकामी सादर करावयाचे आहे.
8. उमेदवाराच्या अनुपस्थितीत कोणत्याही कागदपत्राची तपासणी करण्यात येणार नाही.
9. प्रपत्रात नमूद कागदपत्रां व्यतिरिक्त इतर कोणतीही अनावश्यक व अतिरिक्त कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करण्यात येवू नयेत.
10. गुणपत्रिका अथवा सर्व प्रकारच्या प्रमाणपत्रांच्या पाठीमागील मजकूर सुध्दा छायांकित (Copied) केला पाहिजे.
11. प्रमाणपत्रे इंग्रजी अथवा मराठी अथवा हिंदी या व्यतिरिक्त अन्य भाषेत असतील तर त्यांच्या छायांकित प्रतीसोबत अधिकृत भाषांतर (**Authentic Translation**) जोडणे आवश्यक आहे.

पुढील भागात उमेदवारांच्या माहितीसाठी त्याने कागदपत्रे पडताळणी साठी सादर करावयाची सर्वसाधारण यादी नमूद करण्यात आलेली आहे

**अ. सर्व उमेदवारांनी सादर करावयाची कागदपत्रे :**

| अ.क्र. | कागदपत्राचा प्रकार | तपशील व सुचना |
|---|---|---|
| 1 | उमेदवाराचा ओळख पुरावा | 1. उमेदवाराचे स्वत:चे आधार कार्ड, निवडणुक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लाईसन्स या पैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र.<br>2. या भरती प्रक्रियाअंतर्गत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षा प्रवेश पत्र **(Hall Ticket)** ची प्रत. |
| 2 | नावात बदला संबधी पुरावा | विवाहित स्त्रियांना विवाह निबंधक यांनी दिलेला विवाह दाखला किंवा नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र व इतर वैध पुरावा. |
| 3 | शैक्षणिक अर्हते संबधी पुरावा | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (एस.एस.सी) परिक्षेचे किंवा एखाद्या तत्सम परिक्षेच्या बाबतीत संबंधित मंडळाचे प्रमाणपत्र. |
| | | उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (एच.एस.सी) परिक्षेचे किंवा एखाद्या तत्सम परिक्षेच्या बाबतीत संबंधित मंडळाचे प्रमाणपत्र. |
| | | उत्तीर्ण केलेल्या पदवी परीक्षांच्या किंवा पदविका परीक्षांच्या बाबतीत प्रत्येक परीक्षेचे विद्यापीठाने / सक्षम प्राधिकाऱ्यांने औपचारिकरित्या प्रदान केलेले प्रमाणपत्र. |
| 4 | एम.एस.सी.आय.टी. (MSCIT) | 1) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत एम.एस.सी.आय.टी. (MSCIT) परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा<br>2) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा 'O' स्तर 'A' किंवा 'B' किंवा 'C' स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| 5 | वयाचा पुरावा | (1) माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र किंवा |
| | | (2) जन्म दिनांक नमूद असलेला शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला किंवा |
| | | (3) नगरपरिषद/महापालिका/ग्रामपंचायतीचा जन्म दाखला |
| 6 | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | शासनाने विहित केलेल्या नमुन्यात प्रतिज्ञापन सादर करावे. |

**ब. आरक्षित पदासाठी निवड झालेल्या किंवा आरक्षित उमेदवारासाठी वयोमर्यादेची सवलत घेतलेल्या मागासवर्गीय उमेदवार:**

सामाजिक आरक्षणाच्या पदावर उमेदवाराची निवड झालेली असल्यास उमेदवाराने त्यासंबधी अर्जातील दाव्याच्या पुष्ट्यर्थ संबंधित कागदपत्रांच्या प्रती तपासणी साठी सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी उमेदवाराने सादर करावयाची कागदपत्रे खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कागदपत्राचा प्रकार | तपशील व सुचना |
|---|---|---|
| 1. | जात विषयक प्रमाणपत्र (जातीचा दाखला) | उमेदवार मागासवर्गीय असल्यास जाती/जमाती बद्दल शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील विहित सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जाती विषयक मूळ प्रमाणपत्र |
| 2 | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र | विजा (अ), भज (ब), भज (क), भज (ड) व इमाव व विशेष मागास प्रवर्ग यापैकी प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदावर उमेदवाराची निवड झालेली असेल, अशा उमेदवाराने सन 2017-18 या वित्तीय वर्षाचे क्रीमीलेअर मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले नॉन-क्रिमीलेअर (NCL) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (त्या पूर्वीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.) |

| | | |
|---|---|---|
| 3 | जात प्रमाणपत्र वैधता पडताळणी प्रमाणपत्र | I. उमेदवाराने यापूर्वी त्याच्या जात प्रमाणपत्र वैधता पडताळणी केली असल्यास त्याने सक्षम प्राधिकारी यांनी महाराष्ट्र अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विषेश मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग या साठी आरक्षण) (जातीचे प्रमाणप्रत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन अधिनियम) 2000 नुसार दिलेले मूळ जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र पडताळणी सादर करणे आवश्यक आहे.<br>II. उमेदवाराने यापूर्वी जात वैधता पडताळणी केली नसल्यास नेमणूक देतांना नवी मुंबई महानगरपालिका विहित करेल अशा मुदतीत त्याने जात प्रमाणपत्र वैधता पडताळणीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्र संबधित पडताळणी समिती कडे पाठविणे साठी नियुक्ती प्राधिका-यास / किंवा त्याने याकामी प्राधिकृत केलेल्या प्राधिकारी यांचे कडे सादर करणे आवश्यक आहे.<br>III. या शिवाय संबंधित उमेदवाराने देखील स्वतंत्रपणे जात पडताळणी समितीकडे त्याच्याकडे असलेले कागदपत्रे / पुरावे सादर करुन पाठपुरावा करावा.<br>IV. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, दिनांक12.12.2011 मध्ये विहीत मुदतीत जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकल्यास सदर उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्व सूचना न देता समाप्त करण्याची कार्यवाही नियुक्ती प्राधिका-यांकडून करण्यात येईल. |
| 4 | अधिवास प्रमाणपत्र | उमेदवाराने महाराष्ट्र राज्याचे अधिवास असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Domicile Certificate) सादर करणे बंधनकारक आहे. |

**क. विविध प्रवर्गासाठीच्या समांतर आरक्षणानुसार आरक्षित पदावर निवड झालेल्या किंवा त्यानुसार उच्च वयोमर्यादेच्या सवलतीचा फायदा घेतलेले उमेदवार**

| अ. क्र. | कागदपत्रांचा प्रकार | तपशील व सूचना |
|---|---|---|
| 1 | अ. विविध प्रवर्ग अंतर्गत महिलांच्याआरक्षित पदावर शिफारस करण्यात अपलेल्या महिला उमेदवार | महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: 82/2001/मसेआ-2000/प्र.क्र.415/का.2, दिनांक 25.05.2001 नुसार शासनाने प्रस्तावित केलेले उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलेयर) मोडत नसल्याचे दिनांक 01.04.2017 ते 31.03.2018 या वित्तिय वर्षातील किंवा तद्नंतरचे प्रमाणपत्र. |
| | ब.अमागास महिला या राखीव पदावर निवड झालेल्या उमेदवार उन्नत प्रवर्गात मोडत नसल्याबाबत क्रीमी लेअर प्रमाणपत्र | अमागास/खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदांसाठी दावा करणाऱ्या अराखीव/खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारानी सन 2017-18 या वित्तीय वर्षाचे क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्या बाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले खुल्या प्रवर्गातील महिलांकरिताचे नॉन क्रिमीलेअर (NCL) प्रमाणपत्र |
| 2 | दिव्यांग व्यक्ती | दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षण, वयोमर्यादेचा अथवा कोणत्याही सवलतीचा फायदा घेवू इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: अप्रकि-2012 /प्र.क्र.297 / आरोग्य-6, दिनांक 6 ऑक्टोबर, 2012 मधील आदेशानुसार SADM या संगणक प्रणालीव्दारे वितरित करण्यात आलेले नविन नमुन्यातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र |
| 3 | गुणवत्ताधारक खेळाडू | अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी आरक्षित पदावर दावा करणा-या उमेदवारांनी शासनाने विहित केलेल्या नमुन्यात सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र |
| | | क्रीडा प्रमाणपत्र योग्यअसल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या प्रवर्गासाठी पात्र ठरतो याविषयीअर्ज **सादर करण्यापूर्वीच्या दिनांकाचे सक्षम प्राधिका-याने** प्रदान केलेले प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| 4 | पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवार | पदवीधर /पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांनी त्यानी त्यांना रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून 3 वर्षाच्या अनुभवाची/ अनुभवाबाबत मिळालेले मूळ प्रमाणपत्र व नियुक्ती आदेश शासन सेवेत प्रवेश मिळाल्यास (निवड झाल्यास), सदर प्रमाणपत्र उमेदवाराने नियुक्ती प्राधिका-यांकडे सुपूर्द करणे आवश्यक आहे. |
| 5 | प्रकल्पग्रस्त | सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय : एइएम -1080 /35 /16-अ दिनांक : 21 जानेवारी 1980 नुसार विहित केलेल्या नमुन्यात वशासनाने याबाबत वेळोवेळी विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे संबधीत उमेदवाराचे नाव समाविष्ट असलेला व सदर उमेदवारहा " प्रकल्पग्रस्त व्यक्ती " किंवा प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबून असणारी व्यक्ती " असल्या बाबत संबधीत जिल्हाधिकारी किंवा त्यांच्या वतीने संबधीत पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेल्या दाखला |
| | | उमेदवाराने किंवा उमेदवाराच्या कुटुंबातील इतर व्यक्तीने या दाखल्याच्या आधारे कोणतीही शासकीय /निमशासकीय नोकरी / नियुक्ती प्राप्त केलेली नसल्याबाबत रु. 100/-च्या स्टॅम्प पेपर वरील प्रतिज्ञापत्र |
| 6 | भूकंपग्रस्त | भूकंपग्रस्तांसाठी आरक्षित असलेल्यापदासाठी दावा करणा-या उमेदवारांनी , " सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णयक्रमांक : विकाक 2215 /प्र.क्र.337 /16- ,दिनांक 4 नोव्हेंबर, 2016 च्या तरतुदीनुसार भूकंपग्रस्तांसाठी राखीव असलेल्या 2 % पदांवर नियुक्तीसाठी ज्या कुटुबातील व्यक्तींचे भूकंपात निधन झाले आहे किंवा ज्याचे घर पूर्णपणे कोसळले होते, त्यामुळे त्यांना शासनाने नवीन घर बांधून दिले अशा व्यक्तींचे पाल्यनियुक्तीसाठी पात्र ठरतील " या तरतुदीनुसार संबधीत जिल्हाधिकारी ( उस्मानाबाद व लातूर ) यांच्या कडील दिनांक 4 नोव्हेंबर, 2016 नंतर निर्गमित केलेलाव सदर उमेदवाराचे नाव समाविष्ट असलेला व तोया आरक्षित पदावर नियुक्ती साठी पात्र असलेबाबत दाखला |
| | | उमेदवाराने किंवा उमेदवाराच्या कुटुंबातील इतर व्यक्तीने या दाखल्याच्या आधारे कोणतीही शासकीय /निमशासकीय नोकरी / नियुक्ती प्राप्त केलेली नसल्याबाबत रु. 100/- स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र |